


## एकच ध्येय, एकच ध्यास
पारिजातच्या सभासदांचा सर्वांगीण विकास

# २१ वा वार्षिक अहवाल
सन २०१७-२०१८

# पारिजात
## को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

स्थापना १९९७

नोंदणी क्र. : टी.एन.ए. (टी.एन.ए.) / आर.एस.आर. / सी.आर. / ९५१ / ९७

**प्रशासकीय कार्यालय**
पारिजात भवन, प्लॉट नं. १८, सेक्टर १० ए, नेरुळ, नवी मुंबई ४०० ७०६.
E-mail : parijatsociety@rediffmail.com / parijatsociety@gmail.com

# पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

## विद्यमान संचालक मंडळ



**श्री. कृष्णा पां. धुमाळ**
अध्यक्ष (B.Com,G.D.C.&A)



**श्री. कैलास वि. खोपडे**
उपाध्यक्ष (B.Com,G.D.C.&A)



**श्री.बाळासाहेब वि.ताकवले**
सचिव



**श्री. दिपक शं. टेळे**
खजिनदार (B.A.)



**श्री. श्रीपती शं. गरुड**
संचालक



**श्री. अमृत दा. पाटील**
संचालक



**श्री. आनंदा बा. आंबवले**
संचालक (B.Com)



**श्री. राजेंद्र ना. कोंडे**
संचालक (B.Com)



**श्री. अनंत ना. प्रभाळे**
संचालक



**सौ. मंदाताई ज्ञा. खोपडे**
संचालिका



**सौ. लता बा. ताकवले**
संचालिका



**श्री. काशिनाथ वा. पवार**
संचालक
नगरसेवक, न.मुं.म.पा.



**श्री. शिवाजी गं. सुळ**
संचालक



**श्री. सचिन य. रणनवरे**
कर्मचारी प्रतिनिधी



**श्री. तानाजी गु. शिंदे**
व्यवस्थापक
(B.A.,G.D.C.&A,H.D.C.M.)

# पारिजात को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

रजि. नं. टी.एन.ए.(टी.एन.ए.)/आर.एस.आर./(सी.आर.) १५१/९७
प्रशासकीय कार्यालय : पारिजात भवन, प्लॉट नं. १८, सेक्टर १० ए, नेरुळ (प.), नवी मुंबई-४०० ७०६.

## एकविसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यांत येते की, पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई या संस्थेची एकविसावी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार, दि. ०५/८/२०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता शिवविष्णु मंदीर हॉल, प्लॉट नं. ८/९,सेक्टर ९-अ, वाशी बस डेपोच्या मागे, वाशी, नवी मुंबई,** या ठिकाणी संस्थेचे अध्यक्ष श्री. कृष्णा पां. धुमाळ यांच्या अध्यक्षतेखाली खालील नमूद केलेल्या विषयांचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून कामकाजात भाग घ्यावा ही विनंती.

## सभेपुढील विषय

१) दि. ३०/०७/२०१७ रोजी झालेल्या विसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दि. ३१ मार्च २०१८ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा, संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल, नफा - तोटा व ताळेबंद पत्रक यांना मंजुरी देणे.
३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०१७-२०१८ च्या नफा विभागणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचा वैधानीक लेखापरिक्षण अहवाल वाचून स्विकृत करणे.
५) सन २०१८-१९ सालाकरिता वैधानीक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
६) सन २०१८-१९ या वर्षाकरिता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकाची आणि गत वर्षाच्या अंदाजपत्रकातील खर्चाची माहिती देणे आणि मान्यता घेणे.
७) संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.
८) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचा दोषदुरुस्ती अहवाल वाचुन त्याची नोंद घेणे.
९) उपविधीतील पोट नियम दुरुस्तीस मंजुरी देणे.
१०) संस्थेने तयार केलेल्या धर्मादाय निधी, आकस्मिक निधी, गुंतवणूक चढउतार निधी व माहिती तंत्रज्ञान निधी नियमावलीस मंजुरी देणे. व अन्य निधी
११) संस्थेच्या नवीन शाखा विस्तार करणेस मंजुरी देणे.
१२) संस्थेच्या मुंबई व पुणे विभागातील शाखांसाठी स्वमालकीची जागा खरेदी करण्यास मंजुरी देणे.
१३) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१४) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयावर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या वतीने
**श्री. बाळासाहेब वि. ताकवले**
(सचिव)

ठिकाण : नवी मुंबई.
दिनांक : १०/०७/२०१८

## विशेष सूचना

१) गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास, ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी ही सभा घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२) ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील अगर सुचना करावयाच्या असतील त्यांनी नियोजीत सभेच्या तारखेपूर्वी सात दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात लेखी कळविणे आवश्यक आहे.



# अध्यक्षीय मनोगत...

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

आपल्या संस्थेच्या २१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने संस्थेचा सन २०१७-१८ चा कार्य अहवाल आपल्या हाती सुपुर्द करताना मनापासुन आनंद होत आहे. **''एकमेकां सहाय्य करु अवघे धरु सुपंथ''** या भावनेतुन **''पारिजात पतसंस्था''** दोन दशकांच्या वाटचालीत सभासदांच्या सर्वांगीन विकासासाठी सतत नाविन्याचा व प्रगत तंत्रज्ञानाचा ध्यास घेऊन पुढे जात आहे.

आपल्या संस्थेने प्रगतीचा आलेख उंचावत ३१ मार्च २०१८ अखेर संस्थेच्या ठेवी **रु. ९६ कोटी व कर्ज वाटप रु. ७८ कोटीच्या** पुढे असून संस्थेने **रु. २४ कोटीपेक्षा** जास्त रक्कमेची स्वतंत्र गुंतवणूक केलेली आहे. संस्थेचा **स्वनिधी रु. ९.७० कोटी आहे.** एकुण व्यवसाय **रु. १७५ कोटींचा** असुन, अहवाल सालात एकुण व्यवसाय वाढीचे प्रमाण **२४% इतके आहे.** संस्थेला चालु आर्थिक वर्षात आवश्यक असणाऱ्या सर्व तरतुदी केल्यानंतर **रु. १.११ कोटीपेक्षा** जास्त निव्वळ नफा झाला आहे. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षकांनी संस्थेस **ऑडीट वर्ग 'अ'** दिला आहे.

संस्थेच्या **मुंबई व पुणे विभागात प्रशासकीय कार्यालय व १० शाखा** कार्यरत आहेत. संस्थेने प्रशासकीय कार्यालयात अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असे **स्वमालकीचे ''डाटा सेंटर''** उभारुन **''कोअर बँकिंग संगणक प्रणाली''** द्वारे संस्था सभासदांना सेवा देत आहे. **प्रशासकीय कार्यालय, वाशी शाखा, कोपरखैराणे शाखा** आणि **धनकवडी शाखा** या चार कार्यालयांच्या जागा स्वमालकीच्या आहेत.

संस्थेच्या भविष्यातील प्रगतीसाठी **''कोअर बँकिंग संगणक प्रणाली''** सेवेबरोबरच डिजिटायजेशनची नितांत गरज ओळखून संस्थेने सभासदांसाठी **पारिजात एम पासबुक सेवा, एस एम एस अलार्ट सुविधा, पारिजात नेक्स्ट एजन्सी मोबाईल ॲप, बी बी पी एस युटीलीटी बीलभरणा** इत्यादी डिजीटल सेवा सुरु केल्या आहेत. संस्थेच्या सर्व शाखा एकमेकांशी ऑनलाईन जोडल्या गेल्यामुळे सभासदांना संस्थेच्या कोणत्याही शाखेतून आपल्या खात्यावर व्यवहार करणे सोपे झाले आहे. संस्थेने सुरु केलेल्या पारिजात डिजीटल सेवांमुळे **पारिजातची** जनमानसातील प्रतिमा आणखी उंचावली आहे.

अहवाल वर्षात संचालकमंडळाचे वतीने **परमशांतीधाम वृध्दाश्रम तळोजा** येथे भेट देऊन **एक महिन्याचे अन्नधान्य व फळे वाटप करण्यात आली.** महाराष्ट्र राज्य सैनिक कल्याण विभाग यांना **'' सशस्त्र सेना ध्वजनिधीसाठी '' रु.५०००** ची देणगी देऊन संस्थेने सामाजिक बांधिलकी जपली आहे. संस्थेच्या महिला सभासदांसाठी सर्व शाखांमधून **हळदी कुंकू कार्यक्रमाचे** आयोजन करुन महिलांना योग्य सन्मान दिला आहे. पुणे विभागात सभासदांसाठी खास सभासद प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले. अहवाल सालातील या विशेष उल्लेखनीय घटना आहेत.

सहकारी कायदे व विविध बदलांना सामोरे जाताना संस्थेने बदल स्विकारुन अहवाल सालात **नवीन ७५५ रिक्षा चालकांना स्वताच्या गाडीचे मालक बनविले** आहे. तसेच लहान व्यवसायिक, मध्यमवर्गीय गरजू सभासद व ग्राहकांना मदतीचा हात व आसरा दिला आहे.

सर्व सभासद ठेवीदार हितचिंतक यांचा कामकाज सहभाग व विश्वास आणि आशिर्वाद यामुळेच संस्था दिमाखात यशस्वी वाटचाल करत आहे. संस्थेच्या प्रगतीसाठी सतत झटणारे अभ्यासु संचालक मंडळ, कर्तव्य तत्पर सेवकवर्ग व दैनंदीन ठेव प्रतिनिधी आणि जागरुक सभासद यामुळेच आपली **''पारिजात संस्था''** दिमाखात चौफेर सर्वांगीण प्रगती करीत पुढे चालली आहे. हिच संस्थेच्या चांगल्या कामाची पोचपावती आहे.

**जय हिंद! जय महाराष्ट्र! जय सहकार!**

आपला सहकारी

**कृष्णा धुमाळ**

(अध्यक्ष)

## २१वा वार्षिक कार्य अहवाल सन २०१७-२०१८

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने दिनांक ३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा २१ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा -तोटा पत्रक आपणासमोर सादर करताना आम्हास कर्तव्यपूर्तीचा विशेष आनंद होत आहे.

अहवाल वर्षात संस्थेने केलेल्या प्रगतीची व कामकाजाची कल्पना पुढील आकडेवारीवरुन येईल.

### संस्थेची वित्तीय स्थिती :-

(रु.लाखात)

| तपशिल | ३१/३/२०१७ रु. | ३१/३/२०१८ रु. | वाढ रु. | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | ३२९.६५ | ३७३.१५ | ४३.५० | १३.२० % |
| राखीव व इ.निधी | ६२६.७८ | ७३७.८१ | १११.०३ | १७.७१ % |
| सभासद ठेवी | ८११६.३२ | ९५९६.०१ | १४७९.६९ | १८.२३ % |
| गुंतवणूक | २५९७.३८ | २४८२.४७ | -११४.९१ | -४.४२ % |
| सभासद कर्जे | ५९५५.०१ | ७८४२.२५ | १८८७.२४ | ३१.६९ % |
| खेळते भांडवल | ९३०९.९९ | ११०१२.२२ | १७०२.२३ | १८.२८ % |

पारिजात संस्थेने सहकारी तत्वाचा पुर्ण सन्मान राखून आपल्या आर्थिक व सामाजिक सेवेने आम जनतेमध्ये विश्वासाची,सहकाराची,विकासाची भावना निर्माण केली आहे. सभासद ठेवीदार व हितचिंतक यांच्या सहाय्याने व निःस्वार्थीपणे केलेल्या अव्याहत परिश्रमामुळे संस्थेने आपल्या प्रगतीची उद्दिष्टे व आर्थिक धोरणे जोपासली असून केलेली प्रगती नेत्रदिपक आहे. याबद्दल आपले दुमत होणार नाही याची आम्हाला खात्री आहे.

## संस्थेच्या प्रगतीचा विस्तृत आढावा

### सभासद : १५६३५

गतवर्षी संस्थेचे ११६४७ सभासद होते, अहवाल वर्षात ४१३२ नवीन सभासद झाले आणि १४४ सभासदांनी राजीनामा दिल्यामुळे अहवाल वर्षाअखेर १५६३५ सभासद संख्या झाली आहे.

### भाग भांडवल : रु. ३७३.१५ लाख

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रुपये पाच कोटी असुन गतवर्षाअखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रु. ३,२९,६४,५००/- इतके होते. त्यामध्ये अहवाल वर्षात रु. ४३,५०,२००/- ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २०१८ अखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रु. ३,७३,१४,७००/- इतके आहे. भाग भांडवल वाढीचे शेकडा प्रमाण १३.२०% आहे

### गंगाजळी व इतर निधी : रु. ७३७.८१ लाख

संस्थेची जनमाणसात असलेली विश्वासार्हता ही संस्थेच्या स्वनिधीवर अवलंबून असते. निधी जेवढा जास्त तितका संस्थेचा पायाही मजबूत असतो, यानुसार संस्थेने विविध निधींची उभारणी केली आहे.

गतवर्षाचे संस्थेचे एकुण निधी रु. ६,२६,७७,८१०/- जमा होते. त्यामध्ये अहवाल साली रु.१,११,०२,९६४/- वाढ होऊन वर्षा अखेरीस एकुण निधी रु. ७,३७,८०,७७४/- इतका झाला आहे. या वाढीचे शेकडा प्रमाण १७.७१% इतके आहे.

## ठेवी : रु. ९५९६.०१ लाख

संस्थेच्या ठेवी संकलनामध्ये अहवाल वर्षामध्ये नेत्रदिपक वाढ झालेली असून संस्था देत असलेली ग्राहक सेवा तसेच आपणा सर्वांचा दृढ विश्वास यामुळेच हे साध्य होऊ शकले. दि. ३१/०३/२०१७ अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रु. ८१,१६,३१,२४१/-एवढया होत्या. त्यामध्ये अहवाल वर्षात रु. १४,७९,६९,४०३/- ठेवींची वाढ होऊन दि. ३१/०३/२०१८ अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रु. ९५,९६,००,६४४/- झाल्या आहेत. ठेव वाढीचे शेकडा प्रमाण १८.२३% इतके आहे.

संस्थेच्या विविध योजनांमध्ये अहवाल वर्षाअखेर खालीलप्रमाणे ठेवी जमा झालेल्या आहेत व त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे. रु. लाखात

| ठेवीचा प्रकार | सन २०१४-१५ | सन २०१५-१६ | सन २०१६-१७ | सन २०१७-१८ |
|---|---|---|---|---|
| बचत ठेव | ५,५६,१०,४८८ | ५,८६,७८,८४१ | ७,४५,९५,१९९ | ६,४०,३३,८४९ |
| दैनंदिन बचत ठेव | १२,५४,७८,०५४ | १५,७३,६१,६७७ | १२,४०,५४,९१६ | १३,७१,५७,१०३ |
| अल्प मुदत ठेव | ६,२८,४८,१५० | ६,०५,४२,०४२ | ६,८०,७५,९९४ | ४,७७,१२,८७२ |
| मुदत ठेव | ४,०८,९९,३१७ | ५,०८,८७,२४५ | १३,२६,३५,३१६ | १२,९४,४४,९१३ |
| दामदुप्पट ठेव | ३,३९,४७,२१२ | ३,८३,४१,४४३ | ४,२१,५४,६७७ | ४,४२,३९,००१ |
| पारिजात बक्षीस ठेव | १,३६,९६७ | १,३४,९६७ | १,३४,९६७ | १,३३,९६७ |
| मासिक व्याज प्राप्ती ठेव | ५,६९,८९,६७५ | ८,०७,९०,९०० | १०,५८,६७,३०० | १०,३७,७५,२१५ |
| आवर्त ठेव | ४३,९९,८२४ | ५०,७२,२३२ | ६४,२०,४८४ | ६३,०३,७५६ |
| सभासद ठेव | ३०,०१,३३८ | ३५,०७,३६३ | ३६,९१,८३२ | ३९,३१,२७३ |
| शुभकार्य ठेव | ४,३३,०२,७५५ | ३,९८,८६,४०९ | ३,९५,७९,०९४ | ४,०२,५९,९०५ |
| शुभलक्ष्मी ठेव | २,१२,०४,१५८ | २,६४,१२,३१३ | २,६९,७७,४८९ | २,७७,६६,१५० |
| पारिजात व धनवर्षा ठेव | ८०,०२,०६१ | २९,७३९ | २९,७३९ | २९,७३९ |
| वैभवलक्ष्मी ठेव | ८,९४,४७,६५६ | ९,३८,४३,१७६ | ५,१७,६९,२१५ | १९,०६,३५३ |
| धनसंचय ठेव | ४,२६,८७,२१७ | ८,३१,९५,८३३ | १०,९२,२७,३८९ | २९,०४,५१५ |
| धनसमृध्दी ठेव | ७,८४,७३,३६३ | ८,६७,२३,७४९ | ५४,३५,४४५ | ७,३६,५२१ |
| शुभसंकल्प ठेव | - | ४१,५५,२७९ | १,०६,४०,५२४ | १,६४,१९,५४६ |
| स्वप्नपुर्ती ठेव | - | ६१,२१,७०९ | १,०३,४१,६६१ | १,५०,४८,५२४ |
| इंद्रधनु ठेव | - | - | - | ४,७६,५४,४३० |
| वर्षाऋतू ठेव | - | - | - | ६,५२,४८,९०२ |
| उत्कर्ष ठेव | - | - | - | ४,२८,५५,१२५ |
| परिजात मासिक प्राप्ती ठेव | - | - | - | ४,७७,०४,३०० |
| शुभारंभ ठेव | - | - | - | ९,५८,९२,१७७ |
| गृहलक्ष्मी ठेव | - | - | - | १,८४,४२,५०८ |
| एकूण रु. | ६७,६४,२८,२३५ | ७९,५६,८४,९१७ | ८१,१६,३१,२४१ | ९५,९६,००,६४४ |

## गुंतवणूक : रु. २४८२.४७ लाख

संस्थेने सभासदाना कर्ज वाटप करुनही काही रक्कम शिल्लक राहिली ती रक्कम तशीच शिल्लक न ठेवता विविध बँका मध्ये त्यांची गुंतवणूक करून त्यापासून व्याज मिळवून उत्पन्न वाढीचा प्रयत्न केला आहे. सध्याच्या बँकींग क्षेत्रातील विविध बदलांमुळे गुंतवणूक ही आवश्यक बाब झाली आहे. कायदेशीर बाबींची पुर्तता म्हणूनही गुंतवणूकीस महत्त्व प्राप्त झाले आहे. आर्थिक वर्षात संस्थेने रोख तरलता प्रमाण (CRR) व वैधानिक तरलता प्रमाण (SLR) योग्य प्रकारे दैनंदिन पध्दतीवर ठेऊन महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याने निधींच्या गुंतवणूकी बाबत घालून दिलेल्या सर्व नियमांचे योग्य प्रकारे पालन केले आहे.

दि. ३१/०३/२०१८ अखेर संस्थेची एकूण गुंतवणूक रु. २४,८२,४६,५१६/- एवढी आहे.

(रु.लाखात)

| अ.क्र. | गुंतवणूक तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १. | दि. ठाणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. भाग | १,०००.०० |
| २. | महाराष्ट्र राज्य सहकारी पत. फेडरेशन लि. भाग | ३,०००.०० |
| ३. | राखीव निधी (रिझर्व फंड) | १,८९,२९,४१३.०० |
| ४. | संशयित व बुडित कर्ज निधी | ६६,८६,०५८.०० |
| ५. | लाभांश समानिकरण निधी | १२,१२,०७५.०० |
| ६. | सभासद कल्याण निधी | ६,१७,६१५.०० |
| ७. | सेवक कल्याण निधी | ४,३९,०००.०० |
| ८. | धर्मादाय निधी | ७९,९५३.०० |
| ९. | मुदत ठेव गुंतवणूक | २२,०२,७८,४०२.०० |
| | एकूण रु. | २४,८२,४६,५१६.०० |

## कर्जे : रु. ७८४२.२५ लाख

सहकार खात्याच्या मार्गदर्शक सूचनांनुसार छोट्या व मोठ्या व्यावसायिक, व्यापारी व नोकरदार सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी व त्यांच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी आपली संस्था सदैव कटिबद्ध आहे. म्हणूनच कर्ज वाटपाच्यावेळी सर्वसामान्य सभासदांना आम्ही नेहमी अग्रक्रम दिलेला आहे व त्यांना प्राधान्याने कर्ज पुरवठा करुन सभासदांचे राहणीमान उंचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कर्जदारांनी घेतलेल्या कर्जाची नियमित परतफेड करावी अशी संस्थेची अपेक्षा असते.

गतवर्षाअखेर संस्थेचे रु.५९,५५,००,९५६/-कर्ज येणे बाकी होते अहवाल सालामध्ये संस्थेने सभासदांना रु.४७,५६,१७,२८९/- नव्याने कर्ज वाटप केले असून रु.२८,६८,९२,७८७/- कर्ज वसुल झालेले आहे. अहवाल वर्षाअखेरीस एकूण रु. ७८,४२,२५,४५८/- कर्ज येणे बाकी आहे. या वाढीचे शेकडा प्रमाण ३१.६९% एवढे आहे.

## कर्ज थकबाकी : प्रमाण २.६४%

पतसंस्थाच्या थकबाकी संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्यातर्फे सांगितलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार संस्थांची थकबाकी ही ५% पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. याबाबत आपल्या संस्थेने योग्य कारणासाठी योग्य तारण घेऊन उत्तम प्रकारे कर्ज वाटप केल्यामुळे तसेच थकबाकी होऊ न देण्यासाठी वेळोवेळी कर्जवसुलीसाठी शाखास्तरावर केलेला पाठपुरावा यामुळे कर्जथकबाकी मर्यादित ठेवण्यात संस्था यशस्वी झालेली आहे. मार्च २०१८ अखेर येणे कर्जाशी थकीत कर्जाचे शेकडा प्रमाण २.६४% आहे.

## अनुत्पादक मालमत्ता (N.P.A.) व तरतूदी :-

बँकींग व्यवसायात कर्जास मालमत्ता असेही संबोधले जाते. या मालमत्तेपासून (कर्जापासून) संस्थेस उत्पन्न न मिळाल्यास अशा मालमत्तेस 'अनुत्पादक मालमत्ता' (Non Performing Assets) असे म्हणतात व त्याची वेगळी वर्गवारी करावी लागते. मा. सहकार आयुक्त कार्यालयाने सहकारी पतसंस्थासाठी एन.पी.ए. निकष लागू केले आहेत. संस्थेने प्रभावी व्यवस्थापन ठेऊन एन.पी.ए. नियंत्रणात ठेवला आहे.

सदर अनुत्पादीत कर्जाची संस्थेने १००% पेक्षा अधिक तरतूद केलेली आहे. दि. ३१ मार्च २०१८ अखेर अनुत्पादीत कर्जाची तरतूद खालील प्रमाणे आहे.

(रु.लाखात)

| अ.क्र. | कर्जाचे वर्गीकरण | येणे कर्ज रक्कम | प्रत्यक्ष तरतूद | NPA साठी आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|
| १. | **उत्पादित जिंदगी** | ७१२९.७८ | १७.९० | -- |
| २. | **अनुत्पादित जिंदगी** | | | |
| | अ) सर्वसाधारण जिंदगी | ४२७.८८ | } ६२.१० | २१.३९ |
| | ब) संशयीत जिंदगी | २८४.५९ | | ३८.९५ |
| | क) बुडीत जिंदगी | - | | -- |
| | एकुण | ७८४२.२५ | ८०.०० | ६०.३४ |

एन.पी.ए. साठी आवश्यक तरतूद रु.६०.३४ लाख असताना संस्थेने स्वेच्छेने प्रत्यक्ष तरतूद रु.६२.१० लाख इतकी केली आहे. तसेच संस्थेने चालु आर्थिक वर्षात ''उत्पादित जिंदगी''(Performing Asset) वर ऑडीट निकषाप्रमाणे (०.२५% प्रमाणे) तरतुद रु. १७.९० लाख इतकी केली असून संस्थेची स्थिती अधिकाधिक भक्कम केली आहे हे आपणांस कळविण्यास आनंद वाटतो.

## खेळते भांडवल : रु. ११०१२.२२ लाख

गतवर्षाअखेर संस्थेचे खेळते भांडवल रु. ९३,०९,९८,८८७/- एवढे होते. अहवाल वर्षी संस्थेने सर्व क्षेत्रात भरीव कामगिरी केल्यामुळे रु. १७,०२,२२,६५४/- ने वाढुन रु. १,१०,१२,२१,५४१/- इतके झाले आहे. खेळते भांडवल वाढीचे प्रमाण १८.२८% इतके आहे.

## संचालक मंडळ सभा :

संस्थेचा कारभार गतीमान होण्यासाठी अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण २४ सभा होऊन एकूण ३४८ ठराव पारीत करण्यात आले. तसेच कर्ज मंजुरी व वितरण समितीच्या मुंबई व पुणे विभागाच्या एकूण ४२ सभा, झालेल्या आहेत. त्याचबरोबर नियोजन समिती, कर्मचारी विषयक समिती, लेखापरिक्षण समिती, संगणक समिती व कर्ज वसुली समिती यांच्या आवश्यकतेनुसार वेळोवेळी सभा घेण्यात आल्या. मा. संचालक मंडळ व सर्व समितीच्या मिळून अहवाल वर्षात एकूण ९८ सभा घेण्यात आल्या.

## सभासद, संचालक व कर्मचारी प्रशिक्षण :

तंत्रज्ञानामध्ये सतत प्रगती होत असते, तसेच नियमांत वारंवार बदल होत असतात. संस्थेचे कर्मचारी व संचालक यांचे ज्ञान अद्यावत रहावे या हेतूने तसेच शाखा पातळीवरील कामकाज अधिक कार्यक्षमतेने पार पाडणे, स्पर्धात्मक युगाचे आव्हान पेलण्यासाठी, ग्राहकांना चांगली व समाधानकारक सेवा देणे याकरिता संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांना विविध माध्यामातून सतत प्रशिक्षण देण्यात येते. संस्थेच्या सभासदांना दिनांक ४/११/२०१७ रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे मार्फत सभासद प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करुन शासनमान्य संस्थेकडुन ३२९ सभासदाना प्रशिक्षण देण्यात आले तसेच दि. ०९/०७/२०१७ रोजी सहकार भारती सहकार प्रशिक्षण संस्था या शासन मान्य संस्थेमार्फत दैनंदिन ठेव प्रतिनिधीसाठी लोणावळा येथे प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करुन सर्व दैनंदिन ठेव प्रतिनिधीना प्रशिक्षण देण्यात आले.

## नफा विभागणी : रु. १११.१३ लाख

अहवालसाली एकूण खर्च व नियमानुसार कराव्या लागणाऱ्या तरतुदी वजा जाता रु.१,११,१२,५५६.११ नफा झालेला असून गतवर्षीचा शिल्लक नफा रु. २६०.९२ मिळून नफा रु. १,११,१२,८१७.०३ आहे. सदर नफ्याची विभागणी पुढील प्रमाणे करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे.त्यास आपण मंजुरी द्यावी.ही नम्र विनंती.

| तपशील | | रक्कम रुपये |
|---|---|---|
| राखीव निधी (२५% प्रमाणे) | रु. | २७,७८,३००.०० |
| लाभांश (१०% प्रमाणे) | रु. | ३४,०२,६८६.०० |
| लाभांश समानीकरण निधी | रु. | २,००,०००.०० |
| रौप्य महोत्सव निधी | रु. | ५,००,०००.०० |
| इमारत निधी | रु. | १५,००,०००.०० |
| संशयित व बुडीत कर्ज निधी | रु. | ११,८०,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | रु. | ५१,५००.०० |
| कर्मचारी कल्याण निधी | रु. | ५०,०००.०० |
| गुंतवणूक चढउतार निधी | रु. | २,००,०००.०० |
| सहकार प्रशिक्षण निधी | रु. | २,००,०००.०० |
| माहिती तंत्रज्ञान निधी | रु. | १०,००,०००.०० |
| निवडणूक निधी | रु. | ५०,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक नफा | रु. | ३३१.०३ |
| एकूण | रु. | १,११,१२,८१७.०३ |

## लेखापरिक्षण :

संस्थेचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण श्री. योगेश पाटील अँण्ड कं. (चार्टर्ड अकौंटंट) यांनी केले. त्यांनी संस्थेच्या कामकाजाबद्दल गौरवोद्गार काढले व संस्थेस **'अ'** वर्ग प्रदान केला. तसेच संस्थेचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाची अंतर्गत हिशोब तपासणी श्री. किरण ए.भोसले अँण्ड कं. (चार्टर्ड अकौटंट) यांनी केलेली असून त्यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केले. याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

## उल्लेखनीय बाबी :

संस्थेने अहवाल वर्षात जे उल्लेखनीय उपक्रम राबविले त्याचा तसेच अन्य बाबींचा थोडक्यात परामर्श खालीलप्रमाणे:-

**१) कोअर बँकिंग संगणक प्रणाली :** संस्थेची प्रगती करायची असेल तर तंत्रज्ञानाशिवाय पर्याय नाही हे ओळखुन सभासद व खातेदार यांना तत्पर अचुक व अत्याधुनिक तंत्राद्वारे सेवा देता यावी. याकरीता संस्थेच्या प्रशासकिय कार्यालयात अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असे स्वमालकीचे **"डाटा सेंटर"** उभारून **"कोअर बँकिंग संगणक प्रणाली"** सेवेचा अवलंब केला आहे. संस्थेच्या सर्व शाखा एकमेकांशी जोडल्या गेल्यामुळे सभासदांना संस्थेच्या कोणत्याही शाखेतुन आपल्या खात्यावर व्यवहार करणे सोपे झाले आहे.

**२) पारिजात डिजीटल सेवा :** अहवाल वर्षात संस्थेने सभासदांसाठी सुरु केलेल्या विविध पारिजात डिजीटल सेवांमुळे संस्थेची जनमनसातील प्रतीमा उंचावली आहे.

- **पारिजात एम पासबुक सेवा :** संस्थेने पारिजात एम पासबुक सेवा सुरु करुन सर्व सभासदांना ठेव व कर्जखात्याची माहिती मोबाईल ॲपवर उपलब्ध केली आहे. सभासदांनी गुगल प्लेस्टोर मधुन संस्थेचे मोबाईल ॲप आपल्या मोबाईलवर डाऊनलोड करावे. अथवा दै.ठेव प्रतिनिधी किंवा शाखेशी संपर्क साधावा.
- **एस एम एस अलर्ट सुविधा :** संस्थेने एस एम एस सुविधा सुरु केल्यामुळे सभासदांना खात्यामधील व्यवहारांची माहिती, ठेव मुदतपुर्ती दिनांक, कर्जहप्ता इ एम आय सुचना इ.माहिती एस एम एस सुविधेद्वारे देण्यात येते.
- **बी बी पी एस युटीलीटी बील :** संस्थेच्या सभासदांची सर्व प्रकारची दैनंदिन वापरातील बिले उदा. वीजबील, फोनबील, गॅस बील, डिटीएच रिचार्ज इ. बिले संस्थेच्या सर्व शाखांमधुन भरण्याची सुविधा बी बी पी एस युटीलीटी बील सेवेद्वारे उपलब्ध केली आहे.
- **पारिजात नेक्स्ट एजन्सी मोबाईल ॲप :** संस्थेने पारिजात नेक्स्ट मोबाईल ॲप सुरू केले असुन सदर मोबाईल ॲपचा वापर करुन संस्थेचे दैनंदिन ठेव प्रतिनिधी ठेव वसुलीचे काम करत आहेत. सदर मोबाईल ॲप सुविधेमुळे खातेदारास तत्काळ खात्याविषयी माहीती उपलब्ध झाल्यामुळे खातेदार खुष व समाधानी आहेत.

**३) सामाजिक कार्ये :**

- संस्थेच्या २१ व्या स्थापना दिनानिमित्त संचालक मंडळाने दि. १३ फेब्रुवारी २०१८ रोजी **" परमशांतीधाम वृध्दाश्रम तळोजा "**, ता. पनवेल, जि. रायगड येथे भेट देऊन संचालक मंडळाच्या वतीने एका महिन्याचे अन्नधान्य, नविन साड्या व फळ वाटप करून मदत केली. तेथील वृध्दांची विचारपुस करुन त्यांच्याशी संवाद साधला त्या माध्यमातून संचालक मंडळाने सामाजिक बांधीलकी जपली आहे.
- महाराष्ट्र राज्य सैनिक कल्याण विभाग यांना सशस्त्र सेना ध्वजनिधीसाठी संस्थेने रु. ५०००/- ची देणगी देऊन सामाजिक बांधीलकी जपली आहे.

**४) हळदीकुंकू समारंभ :** अहवाल वर्षात संस्थेच्या सर्व शाखांमध्ये दि. १८ जानेवारी २०१८ ते २५ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत महिला सभासदांकरिता हळदी कुंकू समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यांत आले होते. सदर कार्यक्रमास एकूण १३४ महिला सभासद उपस्थित होत्या. महिला सभासदांसाठी खास हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करुन महिलांना योग्य सन्मान देऊन त्या माध्यमातून संस्थेने सामाजिक बांधीलकी जपली आहे.

**५) महिला दिन :** संस्थेच्या सर्व शाखांमध्ये ८ मार्च २०१८ रोजी जागतीक महिला दिनाचे औचित्य साधुन संस्थेच्या सर्व शाखांमध्ये महिला दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी महिला खातेदार, महिला ठेव प्रतिनिधी, महिला कर्मचारी यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

**६) सर्वोत्तम शाखा पुरस्कार :**

संस्थेच्या कर्मचारी वर्गास प्रोत्साहीत करण्यासाठी उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या शाखेस व कर्मचाऱ्यांस सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात येते. अहवाल वर्षात **सर्वोत्तम शाखा पुरस्कार न्यु पनवेल शाखेस** प्राप्त झाला आहे.

### ७) सर्वोत्कृष्ट दैनंदिन ठेव प्रतिनिधी पुरस्कार :-

मार्च २०१८ अखेर संस्थेकडे ११९ दैनंदिन ठेव प्रतिनिधी काम करीत आहेत. दैनंदिन ठेव वसुलीत उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या दैनंदिन ठेव प्रतिनिधीस सर्वोत्कृष्ट दैनंदिन ठेव प्रतिनिधी म्हणून सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात येते. अहवाल वर्षात मुंबई व पुणे विभागातुन **सर्वोत्कृष्ट दैनंदिन ठेव प्रतिनिधीचा** मान **सिंहगड रोड** शाखेचे ठेव प्रतिनिधी **श्री. राजेंद्र दौलतराव कोंडे** यांना प्राप्त झाला आहे.

### ८) अभिनंदनीय :-

- संस्थेचे मार्गदर्शक मा.श्री. शेखरजी चरेगांवकरसाहेब, यांची महाराष्ट्र शासनाच्या राज्य मंत्री पदाचा दर्जा असलेल्या ''महाराष्ट्र राज्य सहकार परिषद'' या शिखर संस्थेवर ''अध्यक्ष''म्हणून फेरनियुक्ती झाल्याबद्दल संस्थेतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!
- पारिजात संस्थेचे अध्यक्ष श्री. कृष्णा पांडुरंग धुमाळसाहेब यांना शैक्षणीक सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल संकेत कला क्रिडा प्रतिष्ठान पुणे यांचेकडुन राज्यस्तरीय **''संकेत समाजभुषण''** पुरस्कार देऊन गौरविण्यात आल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

## आभार :

सहकार क्षेत्रास उत्तम वळण लागावे, सहकार चळवळ बळकट व्हावी यासाठी प्रयत्नशील असलेले महाराष्ट्र राज्याचे मा. सहकार आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था कोकण विभाग, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था पुणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे तसेच संस्था कार्यक्षेत्रातील सहकारी खात्याचे विविध पदाधिकारी त्यांचेही संस्था ऋणी आहे.

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड कल्याण, महाराष्ट्र राज्य सह. बँक लि., ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि., नवी मुंबई को-ऑप. बँक लि., कॉसमॉस को-ऑप. बँक लि., नॅशनल को-ऑप. बँक लि.,अभ्युदय को-ऑप. बँक लि., महानगर सह. बँक लि., राजर्षी शाहु सहकारी बँक लि., दि.सातारा सहकारी बँक लि., अपना सह.बँक लि., कुर्ला नागरीक सह.बँक लि., पंजाब नॅशनल बँक लि., सारस्वत को-ऑप.बँक लि., कल्याण जनता सह. बँक लि.,शामराव विठ्ठल को-ऑप. बँक लि.,पंजाब ॲण्ड महाराष्ट्र को-ऑप. बँक लि.,जी. पी. पारसिक जनता सह. बँक लि.,भारत बँक लि.,टी.जे.एस.बी.बँक, यांचे शाखाधिकारी व कर्मचारी यांची संस्था आभारी आहे.

संस्थेचे २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षक श्री. योगेश पाटील (चार्टर्ड अकौटंट), अंतर्गत लेखापरिक्षक श्री. किरण अे. भोसले ॲन्ड कंपनी (चार्टर्ड अकौटंट) आणि कर लेखापरिक्षक श्री.बी.आर. सावंत व श्री. व्ही.जी. शिंदे (चार्टर्ड अकौटंट), संगणकासाठी मे. ट्रस्ट सिस्टम्स ॲन्ड सॉफ्टवेअर तसेच संस्थेचे कायदेविषयक सल्लागार ॲड. श्री. सोपान डुंबरे, ॲड. श्री. विलास बारवकर, ॲड. श्री. विजय नलावडे, ॲड. श्री. सुनिल कोरपडे यांनी संस्थेला आस्थेने मार्गदर्शन केल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

संस्थेच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटणारे संस्थेचे कर्मचारी, दै.ठेव प्रतिनिधी, सभासद व ठेवीदार आणि हितचिंतकांनी दिलेले सहकार्य व प्रोत्साहन यामुळेच संचालक मंडळ यशस्वी वाटचाल करू शकले त्याबद्दल आपणा सर्वांचे पुन्हा मन:पुर्वक आभार मानुन आपल्या लोभाची व सहकार्याची वृद्धी व्हावी अशी प्रार्थना करतो.

## श्रद्धांजली :

अहवाल सालामध्ये भारतातील जे थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, साहित्यिक, पत्रकार, सैनिक, कलावंत शिक्षणतज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, सहकार तज्ञ आपल्या संस्थेचे मान्यवर सभासद, ठेवीदार व हितचिंतक दिवंगत झालेले आहेत त्यांना ही सभा नम्रतापूर्वक अभिवादन करुन त्या सर्वांच्या पवित्र स्मृतीस भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**

आपला सहकारी

कृष्णा पां. धुमाळ

(अध्यक्ष)

दि. ३१ मार्च २०१८

| सन २०१६-१७ रु. पैसे | भांडवल व देणी | | सन २०१७-१८ रु. पैसे |
|---|---|---|---|
| ५,००,००,०००.०० | अधिकृत भाग भांडवल : | | ५,००,००,०००.०० |
| ३,२९,६४,५००.०० | वसूल भाग भांडवल : | | ३,७३,१४,७००.०० |
| | राखीव निधी व इतर निधी : | | |
| १,५७,०६,८०२.०० | राखीव निधी | १,८७,१३,३८२.०० | |
| २,९६,६६,२१६.०० | इमारत निधी | ३,५२,६२,४२६.०० | |
| ६२,१०,०००.०० | संशयित बुडीत कर्ज निधी | ६२,१०,०००.०० | |
| ४८,९९९.०० | धर्मादाय निधी | ४३,९९९.०० | |
| १०,१२,०००.०० | लाभांश समानिकरण निधी | १२,१२,०००.०० | |
| ६,१०,७१९.०० | सभासद कल्याण निधी | ६,१३,१०५.०० | |
| ३,८७,०००.०० | सेवक कल्याण निधी | ४,३७,०००.०० | |
| ४,०१,२२३.०० | सहकार प्रशिक्षण निधी | ३,४०,२०१.०० | |
| २८,१२,०००.०० | आकस्मिक निधी | ३६,०६,०००.०० | |
| ८,१५,०००.०० | गुंतवणूक चढउतार निधी | १०,१५,०००.०० | |
| ७,३२,५००.०० | रौप्यमहोत्सव निधी | ११,८२,५००.०० | |
| १४,३०,०००.०० | उत्पादित कर्जावरील संभाव्य तरतुद | १७,१०,०००.०० | |
| २५,६३,९६३.०० | माहिती तंत्रज्ञान निधी | ३०,६३,९६३.०० | |
| २,०१,३८८.०० | निवडणूक निधी | २,११,१९८.०० | ७,३७,८०,७७४.०० |
| | **सभासद ठेवी :** | | |
| ७,४५,९५,११९.८४ | बचत ठेव | ६,४०,३३,८४९.३० | |
| १२,४०,५४,९१६.०० | दैनंदिन बचत ठेव | १३,७१,५७,१०३.०० | |
| ३६,९१,८३२.०० | सभासद ठेव | ३९,३१,२७३.०० | |
| ६४,२०,४८४.०० | आवर्त ठेव | ६३,०३,७५६.०० | |
| ३,९५,७९,०९४.०० | शुभकार्य ठेव | ४,०२,५९,९०५.०० | |
| २,६९,७७,४८९.०० | शुभलक्ष्मी ठेव | २,७७,६६,१५०.०० | |
| १,०६,४०,५२४.०० | शुभसंकल्प ठेव | १,६४,१९,५४६.०० | |
| ६,८०,७५,९९४.०० | अल्प मुदत ठेव | ४,७७,१२,८७२.०० | |
| १३,२६,३५,३१६.०० | मुदत ठेव | १२,९४,४४,९१३.०० | |
| १०,५८,६७,३००.०० | मासिक प्राप्ती ठेव | १०,३७,७५,२१५.०० | |
| ४,२१,५४,६७७.०० | दामदुप्पट ठेव | ४,४२,३९,००१.०० | |
| १,३४,९६७.०० | पारिजात बक्षीस ठेव | १,३३,९६७.०० | |
| २९,७३९.० | पारिजात ठेव | २९,७३९.०० | |
| ५,१७,६९,२१५.०० | वैभव लक्ष्मी ठेव | १९,०६,३५३.०० | |
| १०,९२,२७,३८९.०० | धनसंचय ठेव | २९,०४,५१५.०० | |
| ५४,३५,४४५.०० | धनसमृध्दी ठेव | ७,३६,५२१.०० | |
| १,०३,४१,६६१.०० | स्वप्नपुर्ती ठेव | १,५०,४८,५२४.०० | |
| ९०,७२,७३,५५१.८४ | पुढील पानावर..... | | ७१,१०,९५,४७४.०० |

## रोजीचे ताळेबंदपत्रक

| सन २०१६-१७ रु. पैसे | मालमत्ता व येणी | सन २०१७-१८ रु. पैसे | |
|---|---|---|---|
| | **रोख व बँक शिल्लक :** | | |
| २९,३४,०३६.७५ | रोख शिल्लक | ३२,७२,६१८.४४ | |
| १,३३,५६,३३७.४६ | बँक शिल्लक | ५६,०८,८४०.८३ | ८८,८१,४५९.२७ |
| | **गुंतवणूक :** | | |
| १,०००.०० | ठाणे जिल्हा मध्य सहकारी बँक -भाग | १,०००.०० | |
| ३,०००.०० | महा.राज्य सह.पत.फेडरेशन-भाग | ३,०००.०० | |
| २,२७,९८,११४.०० | ठाणे जि.म.सह.बँक -राखीव व इतर निधी | २,७९,६४,११४.०० | |
| १,५०,००,०००.०० | ठाणे जि. म. सह. बँक - मुदत ठेव | १,७९,२२,४६८.०० | |
| २५,००,०००.०० | नवी मुंबई को-ऑप.बँक - मुदत ठेव | २,१४,८७,३१५.०० | |
| १,१५,००,०००.०० | नॅशनल को-ऑप. बँक - मुदत ठेव | ४७,५०,०००.०० | |
| २,०५,१५,०००.०० | शामराव विठ्ठल को-ऑप. बँक - मुदत ठेव | ८६,८०,५१०.०० | |
| ५०,१२,१२५.०० | अभ्युदय को-ऑप. बँक - मुदत ठेव | ५०,१४,४८७.०० | |
| १,५२,२०,०००.०० | सारस्वत को-ऑप. बँक - मुदत ठेव | ४२,२३,७८०.०० | |
| ८५,००,०००.०० | अपना सह. बँक लि.- मुदत ठेव | १,४०,४१,६६७.०० | |
| १,००,००,०००.०० | महानगर को-ऑप. बँक लि.- मुदत ठेव | १,००,००,०००.०० | |
| २,२५,००,०००.०० | पंजाब अॅन्ड महा.को-ऑप.बँक - मुदत ठेव | २,६०,००,०००.०० | |
| २,००,००,०००.०० | ठाणे जनता सहकारी बँक - मुदत ठेव | ०.०० | |
| २,५२,८८,४००.०० | जी.पी. पारसिक सह. बँक लि. - मुदत ठेव | ३,१९,५८,१७५.०० | |
| १,००,००,०००.०० | डी.एम.के. जावली सह. बँक लि. - मुदत ठेव | २५,००,०००.०० | |
| २,७०,००,०००.०० | शरद सहकारी बँक लि.- मुदत ठेव | २,२०,००,०००.०० | |
| २,३४,००,०००.०० | दि भारत सहकारी बँक लि.- मुदत ठेव | ३,१७,००,०००.०० | |
| ५०,००,०००.०० | श्री वारणा सहकारी बँक लि.- मुदत ठेव | ५०,००,०००.०० | |
| ३०,००,०००.०० | श्री विरशैव सहकारी बँक लि.- मुदत ठेव | २५,००,०००.०० | |
| १,२५,००,०००.०० | दि. सातारा सहकारी बँक लि.- मुदत ठेव | १,२५,००,०००.०० | २४,८२,४६,५१६.०० |
| | **सभासद कर्जे :** | | |
| २,९३,५४,१३१.०० | वैयक्तिक /जामिनकी कर्ज | २,८८,२९,७०२.०० | |
| १,१९,८६,०२१.०० | व्यवसाय तारण कर्ज | १,६६,२५,१०१.०० | |
| ६१,९६,८७४.०० | वाहन तारण कर्ज | ६१,०९,७३४.०० | |
| ४५,३७,९५,९८३.०० | सुरक्षित तारण कर्ज | ४९,२४,३३,५४५.०० | |
| १५,२०,३७७.०० | इतर तारण कर्ज | ११,०३,३९१.०० | |
| ३,७९,१७०.०० | शासकीय रोखे कर्ज | २,९२,०९६.०० | |
| १,४०,००,१०२.०० | दावा दाखल कर्ज | ९८,१८,७४१.०० | |
| ४२,५६,३१७.०० | कर्मचारी वैयक्तिक कर्ज | ३९,६७,८१३.०० | |
| ९९,०२७.०० | कर्मचारी वाहन तारण कर्ज | ५,१८,८०९.०० | |
| ६२,६१,६९०.०० | कर्मचारी घरतारण कर्ज | ५८,७७,२६३.०० | |
| २५,३३,९१८.०० | दैनंदिन ठेव प्रतिनिधी कर्ज | २२,७८,१२१.०० | |
| ५,३४,२४,३२८.०० | ठेव तारण कर्ज | ५,४२,४७,९५६.०० | |
| ८६,८८,९९१.०० | सोने तारण कर्ज | १,११,११,३७२.०० | |
| ३०,०४,०२७.०० | कॅश क्रेडिट कर्ज | २९,८७,९६८.०० | |
| ०.०० | अॅटो रिक्षा तारण कर्ज | १४,८०,२३,८४६.०० | ७८,४२,२५,४५८.०० |
| ८७,१५,२८,९६९.२१ | पुढील पानावर..... | | १०४,१३,५३,४३३.२७ |

दि. ३१ मार्च २०१८

| सन २०१६-१७ रु. पैसे | भांडवल व देणी | | सन २०१७-१८ रु. पैसे |
|---|---|---|---|
| १०,७२,७३,५५१.८४ | मागील पानावरुन....... | | ११,१०,९५,४७४.०० |
| ०.०० | इंद्रधनु ठेव | ४,७६,५४,४३०.०० | |
| ०.०० | वर्षाऋतू ठेव | ६,५२,४८,९०२.०० | |
| ०.०० | उत्कर्ष ठेव | ४,२८,५५,१२५.०० | |
| ०.०० | पारिजात मासिक प्राप्ती ठेव | ४,७७,०४,३००.०० | |
| ०.०० | शुभारंभ ठेव | ९,५८,९२,१७७.०० | |
| ०.०० | गृहलक्ष्मी ठेव | १,८४,४२,५०८.०० | ९५,९६,००,६४४.३० |
| | **इतर देणी** | | |
| २९,९९,१४३.०० | ठेवीवरील देय व्याज | ३३,९०,३४४.०० | |
| ३४,६७,७५३.०० | लाभांश देणे | ४१,४३,७११.०० | |
| ५०,०००.०० | सिक्युरिटी डिपॉझीट | ९०,०००.०० | |
| १८,७४६.०० | अधिभार (सरचार्ज) देणे | २४,१५५.०० | |
| १०,८४०.०० | शेअर्स अनामत खाते | १६,९६०.०० | ७६,६५,१७०.०० |
| | **इतर तरतूदी :** | | |
| १०,६००.०० | व्यवसाय कर | ११,४००.०० | |
| ४३,२४०.०० | आयकर टी.डी. एस. | ६२,६२२.०० | |
| १,५५,६५५.०० | सेवक भविष्य निर्वाह निधी | १,७१,३३६.०० | |
| ४,९३,५००.०० | लेखापरिक्षण फी | ४,९७,६२८.०० | |
| ९,०९२.०० | कर्मचारी विमा हप्ता | ११,५०५.०० | |
| २४,१००.०० | टेलिफोन बिल | १९,०७५.०० | |
| ६५,०००.०० | विज बिल | ५३,३००.०० | |
| १०,५००.०० | व्यावसायिक फी | ०.०० | |
| ३८,७७१.०० | इतर देणी | ४५,५४१.०० | |
| ५,४५,०००.०० | आयकर तरतूद | ६,६७,०००.०० | |
| २,०१,५००.०० | रिटेंशन मनी | ४१,०००.०० | |
| ०.०० | जी एस टी देय | ३४,४७९.६२ | १६,१४,८८६.६२ |
| ६२,५६,५०५.०० | **थकीत व्याज निधी तरतूद :** | | १,०१,३२,५५०.०० |
| | **नफा तोटा खाते :** | | |
| १२१.६६ | मागील वर्षाचा शिल्लक नफा | २६०.९२ | |
| ९३,२५,२६९.२६ | अधिक : चालू वर्षाचा नफा | १,११,१२,५५६.११ | १,११,१२,८१७.०३ |
| ९३,०९,९८,८८७.७६ | एकूण | | १,१०,१२,२१,५४१.९५ |

| मे. योगेश पाटील ॲन्ड कं. | मे. किरण अ. भोसले ॲण्ड कं. | श्री. तानाजी गु. शिंदे |
|---|---|---|
| चार्टर्ड अकौटंट -वैधानिक लेखापरिक्षक | चार्टर्ड अकौटंट -अंतर्गत लेखापरिक्षक | व्यवस्थापक |

## अखेरचे ताळेबंदपत्रक

| सन २०१६-१७ रु. पैसे | मालमत्ता व येणी | | सन २०१७-१८ रु. पैसे |
|---|---|---|---|
| ८७,१५,२८,९६९.२१ | मागील पानावरुन........ | | १०४,१३,५३,४३३.२७ |
| | **मालमत्ता :** | | |
| ४३,५१,००१.०० | फर्निचर व फिक्चर्स खाते | ४०,८९,२१५.०० | |
| २१,४२,६९३.०० | संगणक खाते | १९,२८,८१०.०० | |
| २,९५,१८७.०० | वातानुकूलीत यंत्रे खाते | ३,६१,५८८.०० | |
| ४,४९,२६३.०० | इलेक्ट्रीक साधन सामुग्री खाते | ४,४१,८८७.०० | |
| ३,८५,०२१.०० | कार्यालय साधन सामुग्री खाते | ३,४६,६२५.०० | |
| १,६८,४९,८८२.०० | इमारत खाते | १,६२,०७,३८७.०० | |
| ३३,२९४.०० | डेली कलेक्शन मशिन खाते | १७,७११.०० | |
| ६,२०२.०० | ग्रंथालय खाते | ४,३४१.०० | |
| ५४,७९९.०० | इनव्हर्टर खाते | ४७,१३८.०० | |
| ४५,२०१.०० | दुचाकी वाहन खाते | ३८,४२१.०० | |
| १,०४,७४०.०० | सी.सी. टीव्ही खाते | ७८,६३३.०० | |
| ०.०० | डाटा सेंटर संगणक सिस्टम | ८,६३,३०३.०० | |
| ०.०० | कोअर बँकिंग संगणक सॉफ्टवेअर | २०,१६,३७५.०० | २,६४,४१,४३४.०० |
| | **इतर येणी :** | | |
| ७,८५,०००.०० | कार्यालय अनामत | १०,३५,०००.०० | |
| २०,५३५.०० | दुरध्वनी सुरक्षा ठेव | २१,०३५.०० | |
| ५३,२६०.०० | वीज सुरक्षा ठेव | ५३,२६०.०० | |
| ३,५००.०० | पाणी कनेक्शन सुरक्षा ठेव | ३,५००.०० | |
| ५,०००.०० | बि.ई.एस.टी. सुरक्षा ठेव | ५,०००.०० | |
| ४,१४,६६२.९८ | स्टेशनरी स्टॉक | ४,१३,०५५.८६ | |
| ४,०००.०० | मुद्रांक साठा | २८,८६५.०० | |
| ७८,९०८.०० | आगाऊ विमा | ८९,९४४.०० | |
| ५७४.०० | पॅनकार्ड कुपन्स स्टॉक | १७४.०० | |
| १८,२९,३४३.०० | आयकर खाते (२०१०-११ ते २०१६-१७) | १९,५१,३४३.०० | |
| २३,७६,७१६.०० | कार्यालय नुतनीकरण खर्च | १९,४१,५७०.०० | |
| ५,९६६.०० | आगाऊ खर्च | ६,७९३.०० | |
| १,९२,८७५.५७ | टी.डी.एस. येणे | २,६०,९२६.८२ | |
| २,७८२.०० | लॉकर भाडे | २,९४०.०० | |
| १,०८,२९४.०० | शाखा उद्घाटन प्राथमिक खर्च | ८१,१९४.०० | ५८,९४,६००.६८ |
| | **येणे व्याज :** | | |
| ६२,५६,५०५.०० | सभासद कर्जावरील येणे व्याज | १,०१,३२,५५०.०० | |
| २,००,०६,०४३.०० | गुंतवणूकीवरील येणे व्याज | १,७३,८५,५२४.०० | २,७५,१८,०७४.०० |
| | **ॲडव्हान्स :** | | |
| २०,५००.०० | दै.ठेव प्रतिनिधी मशीन ॲडव्हान्स | १४,०००.०० | |
| २५,८८,१७१.०० | कोअर बँकीग सॉफ्टवेअर उभारणी आगाऊ खर्च | ०.०० | १४,०००.०० |
| ९३,०९,९८,८८७.७६ | एकूण | | १,१०,१२,२१,५४१.९५ |

| श्री. दिपक शं. टेळे | श्री. बाळासाहेब वि. ताकवले | श्री. कृष्णा पां. धुमाळ |
|---|---|---|
| खजिनदार | सचिव | अध्यक्ष |

दि. ३१ मार्च २०१८

| सन २०१६-१७ रु. पैसे | खर्च | सन २०१७-१८ रु. पैसे |
|---:|---|---:|
| ६,६५,००,५८०.०० | सभासद ठेवीवरील व्याज | ६,५४,१४,८९४.०० |
| १,९८,५२८.०० | अधिकर्ष व्याज खर्च | ५,८०,२८९.०० |
| १,३६,९३,५०८.०० | कर्मचारी पगार, बोनस व भत्ते | १,५३,३१,४४९.०० |
| ९,५३,१५८.०० | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संस्था अंशदान | १०,१७,३७४.०० |
| १,९९,०८५.०० | कर्मचारी ग्रुप ग्रॅज्युईटी (एल.आय.सी.) खर्च | ९,८४,४०३.०० |
| १,२०,८९,३७५.०० | दैनंदिन ठेव प्रतिनिधी कमिशन खर्च | ८९,२०,५९९.०० |
| १२,२१,६६०.०० | कार्यालय भाडे | १३,९५,२९८.०० |
| ५,४८,००७.०६ | स्टेशनरी व दिनदर्शिका छपाई खर्च | ५,९३,२९४.७८ |
| ९४,९५०.०० | वार्षिक अहवाल छपाई खर्च | ८६,८१४.०० |
| ३,१०,३०२.०० | किरकोळ खर्च | २,७६,१६५.२८ |
| ७,४३,९०८.०० | विज खर्च | ७,४३,०६५.०० |
| ३,१७,५६४.०० | टेलिफोन खर्च | २,९१,५४२.७२ |
| २,७९,३६१.०० | प्रवास खर्च | ४,२७,८८१.०० |
| ९८,३९८.०० | विमा खर्च | १,२२,६३४.४५ |
| ८,२४९.०० | टपाल खर्च | १५,५५६.०० |
| २,१७,९६१.०० | कार्यालय दुरुस्ती व देखभाल खर्च | १,५६,५१८.९४ |
| ८,०१५.०० | कार्यालय पाणी बिल खर्च | ८,२७१.०० |
| ३२,९६८.०० | संगणक दुरुस्ती व देखभाल खर्च | ४,०९,५२३.२६ |
| ४,६९,८४३.०० | संगणक दुरुस्ती व देखभाल (A.M.C.) | ४,३७,२४०.०० |
| ५,६००.०० | कार्यालय पेस्ट कंट्रोल (A.M.C.) | ११,२००.०० |
| २३,२८४.०० | वातानुकूलीत यंत्रे (A.M.C.) | २४,२६१.०० |
| ५३,५००.०० | डेली कलेक्शन मशीन (A.M.C.) | ४४,९०७.०० |
| ५७,९११.०० | कार्यालय देखभाल व मालमत्ता कर खर्च | ६५,३६१.०० |
| १,२७,६२४.०० | कार्यालय साफसफाई खर्च | १,४०,९१६.१८ |
| ४,५०,०००.०० | लेखापरिक्षण फी (शासकीय व अंतर्गत) | ४,८२,०००.०० |
| १,५७,३३१.०० | व्यावसायिक व कायदे विषयक सल्लागार फी | ४६,९५६.२४ |
| २,५००.०० | व्यवसाय कर खर्च संस्था | २,५००.०० |
| १,९००.०० | सभासद व वर्गणी | ६,५००.०० |
| २८,९७०.०० | दिपावली भेट खर्च | ४०,३०५.०० |
| १,५८,७९१.०० | पुजा खर्च | १,६५,७७६.०० |
| ५६,७७८.३२ | बँक चार्जेस खर्च | ४७,०००.४५ |
| ७०,९२६.१५ | सर्विस टॅक्स खर्च | ११,१५९.९८ |
| ९,९१,८०,५३५.५३ | पुढील पानावर... | ९,८३,०१,६५५.२८ |

## अखेरचे नफा-तोटा पत्रक

| सन २०१६-१७ रु. पैसे | उत्पन्न | सन २०१७-१८ रु. पैसे |
|---|---|---|
| ८,२४,२४,५२३.०० | सभासद कर्जावरील व्याज | ९,०९,१९,६७८.०० |
| २,८३,५८,८८५.०० | गुंतवणुकीवरील व्याज | २,१६,६८,४६५.०० |
| ७,२५,६२६.०० | कर्ज प्रोसेसिंग चार्जेस | ९,६८,१९१.३९ |
| ५,१८,८३८.०० | कर्ज वसुली चार्जेस जमा | १,७७,७४७.६४ |
| १,११,४५१.०० | फॉर्म फी, स्टेशनरी चार्जेस इ. | १,३४,८०९.४६ |
| १५०.०० | लाभांश | १५०.०० |
| ९,६२,४६३.७९ | इतर जमा | ११,९०,८२५.१७ |
| ११,३१,०१,९३६.७९ | पुढील पानावर... | ११,५०,५९,८६६.६६ |

दि. ३१ मार्च २०१८

| सन २०१६-१७ रु. पैसे | खर्च | सन २०१७-१८ रु. पैसे |
|---|---|---|
| ९,९१,८०,५३५.५३ | मागील पानावरुन....... | ९,८३,०१,६५५.२८ |
| ३२,२२८.०० | कर व परवाना फी | ४२,७४८.०० |
| १,३६,८०३.०० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | १,५७,४१२.०० |
| १,७४,६००.०० | संचालक सभा भत्ता खर्च | २,३२,९५०.०० |
| ५,६४६.०० | सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट चार्जेस खर्च | २०,७००.०० |
| १,२४,४२३.०० | भेट व तपासणी खर्च | ०.०० |
| १५,९६७.०० | लॉकर भाडे खर्च | १७,००३.०२ |
| १,८४,७७७.०० | कर्ज वसुली खर्च | ६८,७९१.१० |
| ६५,४९१.०० | जाहिरात खर्च | १,२५,०५९.०० |
| २,२८,०००.०० | सिक्युरिटी गार्ड खर्च | २,३४,०००.०० |
| ८७,०००.०० | ब्रोकरेज खर्च | ०.०० |
| १,२३,२००.०० | कर्मचारी गणवेश खर्च | ०.०० |
| ०.०० | जी एस टी खर्च | ३,७३,१४१.५८ |
| ९३,८८१.०० | मालमत्ता विक्रीतील तुट खर्च | ९०,६८४.०० |
| ३,५१,१५०.०० | कार्यालय नुतनीकरण निर्लेखन खर्च | ४,३५,१४६.०० |
| १,४९,५८०.०० | नविन शाखा कार्यालय उद्घाटन खर्च | २७,१००.०० |
| १,१०,०००.०० | आयकर तरतूद | १,२२,०००.०० |
| १,६५,०००.०० | उत्पादित कर्ज संभाव्य तरतूद | ३,६०,०००.०० |
| २,००,०००.०० | सहकार प्रशिक्षण निधी तरतूद | ०.०० |
| १,००,०००.०० | गुंतवणूक चढ-उतार निधी तरतूद | ०.०० |
| ४,३२,०००.०० | इमारत निधी तरतूद | ०.०० |
| १८,१६,३८६.०० | घसारा | ३३,३८,९२०.५७ |
| **९३,२५,२६९.२६** | **निव्वळ नफा ताळेबंदास वर्ग** | **१,११,१२,५५६.११** |
| ११,३१,०१,९३६.७९ | एकूण | ११,५०,५९,८६६.६६ |

**मे. योगेश पाटील ॲन्ड कं.**
चार्टर्ड अकौटंट -वैधानिक लेखापरिक्षक

**मे. किरण अे. भोसले ॲण्ड कं.**
चार्टर्ड अकौटंट -अंतर्गत लेखापरिक्षक

**श्री. तानाजी गु. शिंदे**
व्यवस्थापक

## अखेरचे नफा-तोटा पत्रक

| सन २०१६-१७ रु. पैसे | उत्पन्न | सन २०१७-१८ रु. पैसे |
|---|---|---|
| ११,३१,०१,९३६.७९ | मागील पानावरुन........ | ११,५०,५९,८६६.६६ |
| ११,३१,०१,९३६.७९ | एकूण | ११,५०,५९,८६६.६६ |

| श्री. दिपक शं. टेळे | श्री. बाळासाहेब वि. ताकवले | श्री. कृष्णा पां. धुमाळ |
|---|---|---|
| खजिनदार | सचिव | अध्यक्ष |

# लेखापरीक्षकांचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कलम ८१ आणि
महाराष्ट्र सहकारी संस्थाचा नियम ६९ (३) अन्वये द्यावयाचा)

प्रति, सभासद

**पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई** यांचे आर्थिक विवरणाचे लेखापरिक्षण आम्ही केले आहे. त्यामध्ये ताळेबंदपत्रक ३१ मार्च २०१८ पर्यंतचे असून, वर्षाच्या अखेरीपर्यंतचे नफा-तोटा विवरणपत्रक आणि हिशेबांच्या धोरणाचा अर्थपुर्ण सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती दिलेली असून, संस्थेचे लेखापरिक्षण आम्ही १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१८ पर्यंतचे केले आहे.

**व्यवस्थापनाची आर्थिक विवरणपत्राची जबाबदारी :**

१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि त्याखाली बनविलेले नियम याअन्वये आर्थिक विवरणपत्र तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. या जबाबदारीमध्ये संकल्पना करणे, अमलात आणणे आणि आर्थिक विवरण तयार करण्याबाबत अंतर्गत नियंत्रण संबंधात महत्त्वाच्या चुकीच्या विवरणापत्रामधून मुक्त राहील मग ती फसवणूक किंवा चुकींमुळे असेल.

**लेखापरिक्षकाची जबाबदारी :**

२) केलेल्या लेखापरिक्षणावर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे व ते आम्ही केलेल्या लेखापरिक्षेच्या पायावर आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम आणि द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस ऑफ इंडिया प्रमाणाप्रमाणे लेखापरिक्षणाचे आम्ही संचालन केले आहे. अशा प्रमाणभूत नितितत्वाच्या पालनाची जरूरी आहे व ती आम्ही पाळली आहे. आणि लेखापरिक्षण योग्य आश्वासनपूर्ती मिळण्याच्या दृष्टीने आर्थिक विवरण महत्त्वाच्या चुकीच्या विवरण पत्रापासून मुक्त राहील व ते फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्याचे पालन आम्ही केले आहे.

३) लेखापरिक्षेमध्ये लेखापरिक्षणामधील जे उघड न केलेले आणि रक्कम यातील पुरावा जमा करणे ही याची पद्धत आहे व ते लेखापरिक्षकाच्या अभिप्रायावर अवलंबून आहे. यामध्ये महत्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरणपत्रामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पद्धत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर अवलंबून आहे. संस्थेने तयार केलेले आर्थिक विवरण अंतर्गत नियंत्रण आणि रास्त सादरीकरण विनियोजनाच्या वापराची पद्धत उचित परिस्थितीत योग्य आहे. लेखापरिक्षेमध्ये जमाखर्चाच्या मूल्यांकनाच्या विनियोजनाच्या वापर, आणि जमा खर्चाचा अंदाज त्याचप्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरणपत्राचे सादरीकरण यांचा समावेश होतो.

४) लेखापरिक्षेचा पुरावा जो आम्ही मिळविला आहे तो अभिप्रायाचा पाया म्हणून पुरेसा आणि योग्य आहे, असा विश्वास आहे.

**अभिप्राय :**

५) आमच्या मतानुसार आणि आम्हास मिळालेल्या पूर्ण माहीतीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ आणि इतर लागू होणारे अधिनियम आणि किंवा निबंधकांनी प्रसिद्ध केलेली संस्थेला

जरुरीची असणारी परिपत्रके आणि योग्य व उचित बळकटी आणण्यासाठी उचित दृष्टीकोन जो सर्वसाधारण पणे भारतात मान्य केले आहे.

१) ताळेबंद पत्रकाच्या संबंधात संस्थेच्या बाबतीत ३१ मार्च २०१८

२) नफा आणि तोटा विवरणपत्राच्या बाबतीत / जमा आणि खर्च, त्या वर्षीच्या शेवटच्या दिवशी, आणि

**इतर कायदेशीर आणि नियामक बाबींवरील अहवाल**

६) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार ताळेबंदपत्रक आणि नफा आणि तोटा विवरणपत्र तयार केलेले आहे.

**आम्ही अहवाल देतो की,**

७) अ) आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार, जे आमच्या लेखापरिक्षणासाठी जरूर आहे ते मिळालेल्या पुऱ्या माहितीनुसार आम्हास असे आढळून आले आहे की, ते समाधानकारक आहे.

ब) संस्थेचे व्यवहार आमच्या दृष्टीस आल्याप्रमाणे संस्थेच्या अधिकारांत करण्यात आले आहेत.

क) आमच्या लेखापरीक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयाकडून व तिच्या शाखांकडून आलेली विवरणपत्रे योग्य आहेत.

८) लेखांकन मानकाप्रमाणे ताळेबंदपत्रक आणि नफा आणि तोटा हिशोब यांचे अनुपालन आमच्या मताप्रमाणे योग्य आहे.

**९) आम्ही आणखी पुढील अहवाल सादर करतो.**

१) या अहवालासंदर्भात ताळेबंदपत्रक आणि नफा आणि तोटा आणि खर्चाचा हिशोब हे हिशोबाची पुस्तके विवरणपत्रे यांचा योग्य मेळ बसत आहे.

२) आम्ही पुस्तकांची तपासणी केल्यानंतर संस्थेने योग्य ती ताळेबंदपत्रके जी अधिनियमानुसार जरुरीची आहेत ती सर्व व्यवस्थित आहेत.

३) आम्ही लेखापरिक्षा केलेल्या शाखांचे ताळेबंदपत्रक शाखा लेखापरिक्षकांनी केले असून, तो आम्हाला जरुरीचा आहे, त्याप्रमाणे दिलेला आहे.

४) लेखापरिक्षा चालू असणाऱ्या वर्षी संस्थेला **''अ''** वर्ग मिळाला आहे

**योगेश पाटील ॲण्ड कं.**
सनदी लेखापाल
सही/-
**योगेश पाटील**
प्रोप्रायटर

**स्थळ : नवी मुंबई**
**दिनांक : ०५/०७/२०१८**

## अंदाज पत्रक सन २०१८-२०१९

(रु.लाखात)

| उत्पन्न तपशिल | अंदाजे उत्पन्न २०१७-२०१८ | प्रत्यक्ष उत्पन्न २०१७-२०१८ | अंदाजे उत्पन्न २०१८-२०१९ |
|---|---|---|---|
| १ कर्जावरील व्याज | ९२५.०० | ९०९.२० | १०८०.०० |
| २ गुंतवणुकीवरील व्याज | २३५.०० | २१६.६८ | २१२.२५ |
| ३ इतर उत्पन्न | २७.०० | २४.७२ | २८.०० |
| एकूण रु. | ११८७.०० | ११५०.६० | १३२०.२५ |

| खर्च तपशिल | अंदाजे खर्च २०१७-२०१८ | प्रत्यक्ष खर्च २०१७-२०१८ | अंदाजे खर्च २०१८-२०१९ |
|---|---|---|---|
| १ सभासद ठेवीवरील व्याज | ६८५.०० | ६५४.१५ | ७७०.०० |
| २ कर्मचारी पगार, बोनस,भ.निर्वाह निधी व ग्रॅज्युईटी खर्च * | १६८.१० | १७३.३३ | १८७.५० |
| ३ दैंनदिन ठेव प्रतिनिधी कमिशन खर्च | १२०.०० | ८९.२१ | ९५.०० |
| ४ स्टेशनरी व अहवाल छपाई खर्च | ८.५० | ६.८० | ९.२५ |
| ५ वार्षिक सभा व संचालक भत्ता खर्च | ४.०० | ३.९० | ४.९० |
| ६ प्रवास, किरकोळ, दिवाळी भेट, व कर्मचारी गणवेश खर्च | ११.०० | ७.४४ | १०.१० |
| ७ विमा व पोस्टेज खर्च | १.७५ | १.३९ | २.०० |
| ८ विज,फोन,पाणी, कार्यालय भाडे, सर्विस टॅक्स, टॅक्स व लायसन्स फी, मालमत्ता कर व मेंटनन्स चार्जेस इ. * | २८.५० | २९.३० | ३४.४५ |
| ९ देखभाल व दुरुस्ती, उद्घाटन नुतनीकरण, पुजा खर्च, साफसफाई खर्च व सिक्युरिटी गार्ड खर्च | १०.०० | ७.२५ | ९.७५ |
| १० ऑडीट फी खर्च | ६.०० | ४.८२ | ६.०० |
| ११ AMC वर्गणी, व्यवसाय कर कायदेशीर सल्लागार फी व ब्रोकरेज | ७.५० | ५.७३ | ५.६३ |
| १२ ओव्हर ड्राप्ट कर्ज व्याज, बँक चार्जेस व लॉकर भाडे * | ५.२५ | ६.४४ | १०.२५ |
| १३ कर्ज वसुली व जाहिरात खर्च | ३.६० | १.९४ | ३.७० |
| १४ घसारा खर्च * | २०.०० | ३३.३९ | ३४.५० |
| १५ तरतूदी (Std Asst.Provision & Income Tax Provision) | ५.०० | ४.८२ | ५.०० |
| १६ अन्य खर्च (सॉफ्टवेअर डेव्ह.,संगणक दुरुस्ती व मालमत्ता विक्री तुट, कार्यालय नुतनीकरण खर्च, ~~जीएसटी खर्च~~) * | २.०० | ९.५६ | १०.०० |
| १७ नफा | १००.८० | १११.१३ | १२२.२२ |
| एकूण रु. | १,१८७.०० | १,१५०.६० | १३२०.२५ |

* अंदाजापेक्षा अधिक झालेल्या खर्चास मा. संचालक मंडळाने मंजुरी दिली असून वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी शिफारस करीत आहोत.

# परिशिष्ट - 'अ'

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे नांव | : | **पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई.** |
| प्रशासकीय कार्यालय | : | पारिजात भवन, प्लॉट न. १८, सेक्टर १०ए, नेरुळ (प.), नवी मुंबई- ४०० ७०६. |
| नोंदणी क्रमांक | : | टी.एन.ए./(टी.एन.ए.)/आर.एस.आर. (सी.आर.)/ ९५१-सन १९९७ |
| कार्यक्षेत्र | : | बृहन्मुंबई, ठाणे, रायगड व पुणे जिल्हा |
| शाखा | : | दहा (प्रशासकीय कार्यालय व्यतिरिक्त दहा शाखा) |
| सभासद संख्या | : | १५,६३५ |
| अधिकृत भाग भांडवल | : | रु. ५,००,००,०००.०० |
| वसुल भाग भांडवल | : | रु. ३,७३,१४,७००.०० |
| राखीव व इतर निधी | : | रु. ७,३७,८०,७७४.०० |
| ठेवी | : | रु. ९५,९६,००,६४४.३० |
| कर्जे | : | रु. ७८,४२,२५,४५८.०० |
| बाहेरील कर्जे | : | नाही |
| गुंतवणूक | : | रु. २४,८२,४६,५१६.०० |
| लेखापरिक्षण वर्ग | : | **''अ''** |
| अहवाल सालातील नफा | : | रु. १,११,१२,८१७.०३ |
| कर्मचारी वर्ग | : | ६३ |
| खेळते भांडवल | : | रु. १,१०,१२,२१,५४१.९५ |

## संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक कर्ज तपशील :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ (२) नुसार संचालक सदस्य व त्यांचे नातेवाईक यांच्या ३१ मार्च २०१८ अखेर येणे असलेल्या कर्जाचा तपशिल खालील प्रमाणे

| तपशिल | ३१-०३-१७ अखेर येणे कर्ज | सन २०१७-१८ दिलेले कर्ज | सन २०१७-१८ वसुल कर्ज | ३१-०३-१८ अखेर येणे कर्ज | येणे कर्जापैकी थकबाकी रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| संचालक | १३०.२८ | ०.०० | २७.५५ | १०२.७३ | निरंक | |
| नातेवाईक | ९५.८५ | ४.५९ | ७.२६ | ९३.१८ | निरंक | |
| **एकूण** | **२२६.१३** | **४.५९** | **३४.८१** | **१९५.९१** | **निरंक** | |

## संस्थेची गत पाच वर्षातील आर्थिक प्रगती

| सन | २०१३-२०१४ | २०१४-२०१५ | २०१५-२०१६ | २०१६-२०१७ | २०१७-२०१८ |
|---|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | २,१७,४४,६०० | २,४९,३१,५०० | २,८०,२७,६०० | ३,२९,६४,५०० | ३,७३,१४,७०० |
| गुंतवणूक | २०,२१,९९,७७३ | २४,०६,७६,३९४ | ३१,०५,७४,०२५ | २५,९७,३७,६३९ | २४,८२,४६,५१६ |
| ठेवी | ५८,१९,८७,३६२ | ६७,६४,२८,२३५ | ७९,५६,८४,९१७ | ८१,१६,३१,२४१ | ९५,९६,००,६४४ |
| कर्जे | ४०,१७,७६,०३९ | ४७,६४,६६,०९८ | ५२,९१,३६,४५७ | ५९,५५,००,९५६ | ७८,४२,२५,४५८ |
| खेळते भांडवल | ६५,५७,६९,१०३ | ७६,४०,८१,०१६ | ८९,९५,९५,३८७ | ९३,०९,९८,८८७ | १,१०,१२,२१,५४१ |

## क्रियाशील सभासद :

सर्व सभासदांना सुचित करण्यास येते की, पोटनियमातील तरतुदीनुसार आपण क्रियाशील सभासद म्हणून पात्र राहण्याकरिता सलग ५ वर्षात एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे व एक वर्षासाठी कमीत कमी रु. १०,०००/- ची ठेव ठेवणे किंवा रु. ५,०००/- कर्ज घेणे आवश्यक आहे. तरी आपण सदर बाबींची नोंद घेऊन त्याची त्वरीत पूर्तता करावी.

## उपविधी पोटनियम दुरुस्ती

### (उपविधी पोटनियम दुरूस्ती क्र. (क) ७)

| उपविधीचा अनुक्रमांक | सध्याच्या उपविधीची शब्दयोजना | दुरुस्त उपविधीची शब्दयोजना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| नियम क्र. ७ | संस्थेच्या दर्शनी भागाची किंमत रु. १००/– (अक्षरी रुपये शंभर फक्त) इतके राहिल. संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. ५,००,००,०००/– इतके (अक्षरी रुपये पाच कोटी) इतके असून ते रु. १००/– (अक्षरी रुपये शंभर फक्त) दर्शनी किंमतीच्या ५,००,०००/– इतक्या भागात विभागलेले असेल. | संस्थेच्या दर्शनी भागाची किंमत रु. १००/– (अक्षरी रुपये शंभर फक्त) इतके राहिल. संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. १०,००,००,०००/– इतके (अक्षरी रुपये दहा कोटी) इतके असून ते रु. १००/– (अक्षरी रुपये शंभर फक्त) दर्शनी किंमतीच्या १०,००,०००/– इतक्या भागात विभागलेले असेल. | भागभांडवलात दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे सध्याची अधिकृत भागभांडवल मर्यादा कमी पडू नये म्हणून यात दुरूस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे. |

## सभासदांना सूचना :

- सभासदाने आपला पत्ता व मोबाईल क्रमांक बदलला असल्यास शाखा कार्यालयास लेखी सुचना त्वरीत करावी.
- ज्या सभासदांनी आपले वारस नेमले नसतील त्यांनी आपले वारस नेमून घ्यावेत.
- सर्व सभासदांचे लाभांश व भाग दाखले तयार आहेत ते संबंधीत शाखेतून घेऊन जावेत.
- कर्ज मागणी करताना सभेपूर्वी ३ दिवस अगोदर कर्ज मागणी अर्ज शाखेत जमा करावेत.
- पूर्ण भरलेले व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेले अर्ज कर्ज मंजूर सभेत ठेवले जातील.
- आपण घेतलेल्या कर्जाचे हप्ते वेळेवर भरा व संस्थेस सहकार्य करा.
- प्रत्येक महिनाच्या शेवटी आपले कर्ज, दैनंदिन ठेव, आवर्तक ठेव या खात्यांच्या पासबुकावर संस्थेत येऊन अधिकाऱ्यांची सही घ्यावी.
- संस्थेच्या जुन्या व नविन सभासदांनी के.वाय.सी. नॉर्मस्ची पुर्तता करणे आवश्यक आहे. त्यासाठी आपले ज्या शाखेत खाते आहे. त्या शाखेत संपर्क साधून आपल्या खात्यासाठी आवश्यक के.वाय.सी. कागदपत्रांची (वास्तव्याचा व ओळख पुरावा व फोटो) पूर्तता करावी.
- संस्थेच्या व सभासदांच्या हिताच्या दृष्टीने आपला सल्ला व मार्गदर्शन लेखी स्वरुपात कळवा.

# आपल्या सेवेत कार्यरत आमच्या शाखा

**प्रशासकीय कार्यालय :** पारिजात भवन, प्लॉट नं.१८, सेक्टर १० ए, नेरुळ (प.), नवी मुंबई ४०० ७०६.
दुरध्वनी : ०२२-२७७०५१२७ / २७७२४२०१ / ९०२२४४७९९०

## ● मुंबई विभाग ●

**वाशी**
अे-३/७, सेक्टर -१५, मराठा भवन मार्ग, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.
फोन : ०२२-२७८०२६५९ / ९०२२१८६६६४

**नेरुळ**
साईप्रसाद शॉपिंग कॉम्प्लेक्स, शॉप नं. २८, प्लॉट नं. १७, सेक्टर -८, नेरुळ,
नवी मुंबई - ४०० ७०६. फोन : ०२२-२७७०६९८५/९०२२०९६९८५

**दादर**
अे.आर. हाऊस, रुम नं. ०९, पहिला मजला, बँक ऑफ महाराष्ट्र समोर,पोर्तुगीज चर्चजवळ,
गोखले रोड, दादर(प.), मुंबई-४०० ०२८. फोन : ०२२-२४३००६६५/९०२२८७१६६५

**कोपरखैरणे**
के.पी. हेरिटेज को-ऑप.हौ.सो., शॉप नं.१४, प्लॉट नं.४१, सेक्टर -७, पोस्ट ऑफिस समोर,
कोपरखैरणे, नवी मुंबई - ४०० ७०९ फोन : ०२२-२७५४१९९४/९०२२१५१८०६

**न्यु पनवेल**
ओमश्री निकेतन को-ऑप.हौ.सो., शॉप नं.८, प्लॉट नं.१२ ए, सेक्टर -१, महात्मा शाळेसमोर,
खांदा कॉलनी, न्यु पनवेल-४१०२०६ फोन : ०२२-२७४८१९९७/९०२२९७४६५८

**ठाणे**
ऑफिस नं. २१०, दुसरा मजला, बाल गणेश टॉवर, दादा पाटील वाडी, ठाणे स्टेशन जवळ,
ठाणे (प.) - ४०० ६०१. फोन : ०२२-२५३९६६४३/४१००६८७३

## ● पुणे विभाग ●

**धनकवडी**
शॉप नं. ३४, अजंठा पॅलेस सहकारी गृहरचना संस्था मर्या. सर्व्हे नं. २०/२१, बालाजी नगर,
धनकवडी, पुणे - ४११ ०४३. फोन : ०२०-२४३७६६६२ / ९०२१२०६७४६

**हडपसर**
शॉप नं.४१,अमर समृद्धी कॉम्प्लेक्स, आकाशवाणी केंद्राजवळ, सोलापुर रोड, हडपसर,
पुणे - ४११ ०२८. फोन : ०२०-२६९९११९८० / ९०२१८१७६७१

**सिंहगड रोड**
सुर्या प्लाझा, शॉप नं.१०, पहिला मजला, सर्वे नं.-८, धायरी रोड, वडगाव खुर्द,
पुणे-४११०४१. फोन : ०२०-२४३९०६४६/९०२१२३११०२

**चंदननगर**
बेंद्रे बिल्डींग, पहिला मजला, सर्व्हे नं. -४६/१, संघर्ष चौक, खराडी रोड,
चंदननगर, पुणे - ४११ ०१४. फोन : ९०२१२११७२२




संस्थेचे उत्कृष्ट दैनंदिन ठेव प्रतिनिधी
श्री. आण्णासाहेब बबन पिसे यांचा सत्कार करताना
संस्थेचे खजिनदार श्री. दिपक टेळे साहेब
आणि मा. संचालक मंडळ




विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थी
कु. प्रज्ञेश शेवाळे ह्याला स्मृती चिन्ह व पारितोषिक
देताना संस्थेचे उपाध्यक्ष श्री. कैलास खोपडे साहेब
आणि मा. संचालक मंडळ.




सन २०१६-१७ आर्थिक वर्षाचा सर्वोत्तम शाखा पुरस्कार
स्विकारताना संस्थेच्या नेरुळ शाखेचे शाखाधिकारी,
कर्मचारी वृंद व दैनंदिन ठेव प्रतिनिधी.




संस्थेच्या कोपरखैरणे शाखेत आयोजीत
हळदी-कुंकू कार्यक्रमास उपस्थित
महिला सभासद खातेदार.

# पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई



संस्थेची दादर शाखा स्थलांतर सोहळा
नुतन कार्यालयाचे उद्‌घाटन करताना
संस्थेचे अध्यक्ष श्री. कृष्णा धुमाळ साहेब
आणि मा. संचालक मंडळ.




पारिजात डिजीटल सेवा शुभारंभप्रसंगी संस्थेचे
अध्यक्ष श्री.धुमाळ साहेब, उपाध्यक्ष श्री. खोपडे साहेब,
सचिव श्री. ताकवले साहेब, संचालक मंडळ आणि अधिकारी वर्ग




संस्थेच्या २१व्या स्थापना दिना निमित्त संचालक मंडळाच्या
वतीने परमशांती धाम वृद्धाश्रम,तळोजा येथे भेट देऊन एक
महिन्याचे अन्नधान्याची मदत व फळे वाटप करुन संचालक
मंडळाने समाजातील बांधिलकी जपली आहे.




अहवाल वर्षात संस्थेने ७५५ सभासदांना स्वयं रोजगारासाठी
मदत करुन रिक्षा मालक बनविले आहे. कोपरखैरणे शाखेतील
सभासद श्री. शंकर राम सरोज यांना नविन रिक्षाची चावी
वितरण करताना संस्थेचे अध्यक्ष श्री. कृष्णा धुमाळ साहेब
आणि संचालक मंडळ व अधिकारी वर्ग

प्रेषक :

**पारिजात**
**को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.**

पारिजात भवन, प्लॉट नं. १८, सेक्टर १० ए, नेरुळ(प.),
नवी मुंबई ४०० ७०६. फोन : २७७०५१२७/९०२२४४७९९०

बुक - पोस्ट
प्रति ,

___

___

___

आमंडकर प्रिंटर्स, वाशी, नवी मुंबई. © २७८८९३७७ / ९८२०५८०२५२